# श्री मंगल बिसराम जामकर –ग्राम गाडसिंबा

नाबार्ड प्रायोजित वाडी परियोजने अंतर्गत नागेश्वरा चॅरीटेबल ट्रस्ट, नागपुर व्दारा ग्राम गाडसिंबा ता. चिखलदरा या आदिवासी लोक वस्तीच्या गावात आदिवासी वाडीधारक शेतक–यांची निवड करुन 1x1 मिटरचे खड्डे खोदुन 40 आंबा व 20 आवळा याप्रमाणे बगीच्या लावण्यात आला. सर्व लाभार्थ्यांना संस्थेतर्फे खत, स्प्रे व सर्व साहित्य पुरविण्यात आले. वाडीच्या संरक्षणाकरीता व वाढीकरीता सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्यात आले. परंतु आदिवासींची ओढ त्वरीत आमदनी कडे असल्यामुळे वाडीकडे विशेष लक्ष देत नाहीत. परंतु एन. सी. टी. तर्फे प्रकल्प समन्वयक, कृषी तांत्रिक अधिकारी व फिल्ड सुपरवायजर यांच्या रोजच्या मार्गदर्शनाखाली वाडी सफल करण्यासाठी प्रयत्न होत आहे



या गावात मंगल बिसराम जामकर वय वर्ष 51 हा एक वाडीधारक असुन कोरडवाहु शेतामध्ये एक एकर जागेत 40 आंबा 20 आवळा यांची झाडे लावण्यात आली. घरची परिस्थिती जेमतेम होती. आंब्याला फळ येण्यासाठी 5 वर्षे वेळ होता. त्यामुळे वाडीकडे बघण्याचा दृष्टीकोन नकारात्मक होता. परंतु त्यांना सतत भेटुन ,लागणारे साहित्य व मार्गदर्शन देवुन त्यांचे विचार सकारात्मक (सोच) करवुन घेतली व भविष्यात मिळणा–या उत्पादनाचे महत्व सांगुन, त्यांना एन. सी. टी. तर्फे नेटचे शेड बांधुन दिले व त्यात गादी वाफे तयार करुन भाजीपाला मिरची, टमाटर यांचे रोप तयार करुन दिले त्यापासुन त्यांनी जे उत्पादन काढले त्यात त्यांना भरपुर नफा मिळाला. ग्रामपंचायतकरीता विहीर खोदण्यासाठी शेतात जागा दिली. त्यामुळे 24 तास पाण्याची सोय झाली. संस्थेच्या मार्गदर्शनात गहु, चना यांचे उत्पादन घेण्यात आले. त्यामुळे नफयात भरपुर वाढ झाली व त्याने बैलजोडी विकत घेतली. चौथ्या वर्षी त्यांना कमी प्रमाणात आंबा व आवळयाचे पिक झाले ते विकुन त्यांनी 8,000 रु. कमावले.



त्यांचा आत्मविश्वास वाढला व जिद्दीने वाडीची चांगल्या प्रकारे देखभाल करत आहे व भरपुर मेहतन घेत आहे.. वाडी परियोजनेमुळे व कृषी तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनामुळे त्यांचे नकारातत्मक विचार बदलुन त्यांच्या उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे त्याचे व त्याच्या कुटुंबाचे राहणीमान उंचावले. मंगल याने बॅंकेत नविन खाते उघडुन पैसे जमा करणे सुरु केले. शेतात गोठा तयार करुन दोन गाई व म्हशी विकत घेतल्या. त्यापासुन उत्पन्न सुरु झाले. आज त्यांनी दोन एकर शेताची खरेदी केली. आज त्यांचे कुटुंब अतिशय आनंदात राहत आहे. हा बदल घडवुन आण्याचे श्रेय ते नागेश्वरा चॅरीटेबल ट्रस्टला व कृषी तांत्रिक अधिकारी यांना देतात.



तसेच, त्यांची वाडी पाहुन गावातील इतर वाडीधारक प्रेरणा घेउन आपले आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी संस्थेच्या मार्गदर्शनात मेहनत घेत आहे.